## शब्दांचा अवकाश



जयंत नारळीकर

jayant@iucaa.emet.in

# ब्रिटिश बॉबीचे बावनकशी अनुभव

**कुठं आणि कसं, या प्रश्नांवर उत्तरं शोधायचा इंग्लंडमधला खात्रीचा मार्ग म्हणजे पोलिस. भारतात आपण पोलिस वगळून इतर कुणालाही विचारतो; मग त्यात पानवाला, रिक्षावाला, पेट्रोलपंपवाला... असे सगळे येतात. त्यांची माहिती बरोबर असेलच असं नाही, तरीही आपण त्यांनाच विचारतो; पण इंग्लंडमध्ये खात्रीलायक माहिती देणारी व्यक्ती म्हणजे बॉबी!**



रॉबर्ट पील

'बॉबी' हे ब्रिटिश पोलिसाला दिलेलं टोपणनाव! या पोलिस यंत्रणेची सुरवात १८२९ मध्ये सर रॉबर्ट पील यांनी केली. त्या वेळी त्यांनी पोलिसांसाठी नऊ मार्गदर्शक तत्त्वं मांडली होती.

- पोलिसांनी गुन्हे आणि शांतताभंगाचे प्रकार टाळावेत, ही त्यांच्याकडून अपेक्षा.
- पोलिसांचं कर्तृत्व 'पोलिस ॲक्शन'मधून दिसून येत नाही, तर ते गुन्हे आणि शांतताभंग यांच्या अभावातून ओळखावं.
- शांतता आणि नियमांचं पालन यांची एखाद्या ठिकाणी पुनर्स्थापना करताना पोलिसांनी इतर मार्ग- सामोपचार, ताकीद आदी, बंद झाल्यावरच बळाचा उपयोग करावा.

'आर्तत्राणाय वः शस्त्रं न प्रहर्तुमनागसि' (तुझं शस्त्र पीडितांच्या रक्षणासाठी आहे; दुर्बलांवर प्रहार करण्यासाठी नव्हे!) हे 'शाकुंतल'मध्ये दुष्यंताला करण्यात आलेलं आवाहन, रॉबर्ट पील यांनी आखून दिलेल्या पोलिस आचारसंहितेला तंतोतंत लागू होतं. 'रॉबर्ट'चं नामकरण पुष्कळदा 'बॉब' अथवा 'बॉबी' असं केलं जातं; म्हणून पील यांनी सुरू केलेल्या पोलिस परंपरेतल्या सदस्यांना 'बॉबी' असं म्हटलं जातं. ब्रिटनमध्ये बॉबीची प्रतिमा एकंदरीत स्वच्छ आणि 'जनतेचा मित्र' अशी आहे. तिथल्या १५-१६ वर्षांच्या वास्तव्यात मला बॉबीचे आलेले काही अनुभव असे आहेत.

* * *

१९५९ मध्ये भारतीय क्रिकेट टीमचा इंग्लंडमध्ये दौरा होता. दौऱ्याला आलेल्या परदेशी टीम्स ऑक्सफर्ड आणि केंब्रिज विद्यापीठांत जाऊन तिथंही खेळत. त्याप्रमाणे भारतीय टीम केंब्रिजला येऊन जिंकून गेली. फेनर्स क्रिकेट मैदानात हजेरी लावून एक दिवस मी ती मॅच पाहिली. त्या अनुभवानंतर लॉर्डस मैदानावर टेस्ट पाहावी असं मला वाटलं. १९ जून हा मॅचचा दुसरा दिवस होता. त्या दिवशी 'डे-रिटर्न' म्हणजे त्याच दिवशी परतायचं स्वस्त तिकीट काढून मी लंडनला गेलो.

मॅच ११.३० ला सुरू होणार होती. सेंट जॉन्स वूड ट्यूब स्टेशनवरून चालत मी लॉर्डसच्या परिसरात पोचलो, तेव्हा ११ वाजले होते. इथं तिकीट कुठं काढायचं, हा प्रश्न होता. कुठं आणि कसं, या प्रश्नांवर उत्तरं शोधायचा इथं खात्रीचा मार्ग म्हणजे पोलिस. भारतात आपण पोलिस वगळून इतर कुणालाही विचारतो; मग त्यांत पानवाला, रिक्षावाला, पेट्रोलपंपवाला... असे सगळे येतात. त्यांची माहिती बरोबर असेलच असं नाही, तरीही आपण त्यांना विचारतो; पण इंग्लंडमध्ये खात्रीलायक माहिती देणारा म्हणजे बॉबी.

तिथं एक बॉबी उभा दिसला. मी त्याला गाठलं आणि विचारलं : "इथं आजच्या मॅचची तिकिटं कुठं विकतात, सांगू शकता काय?"

त्यानं मला आपादमस्तक न्याहाळलं आणि विचारलं : "तुम्ही भारतातून आलात काय?"

मी होकार दिल्यावर त्याचा दुसरा प्रश्न : "तुम्ही विद्यार्थी आहात काय?"

मी परत होकार दिला आणि मनातल्या मनात म्हटलं, की मी विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर न देता हा उलटपक्षी मलाच का प्रश्न विचारतोय? पण माझं कुतूहल शमवीत बॉबी म्हणाला : "आज एक सद्गृहस्थ माझ्याकडं एक तिकीट देऊन गेले आहेत. अचानक उद्भवलेल्या कारणामुळं ते आज मॅच पाहू शकणार नाहीत. आपलं तिकीट एखाद्या भारतीय विद्यार्थ्याला द्यावं, अशा सूचनेसह त्यांनी मला हे तिकीट दिलेलं आहे," असं म्हणून त्यानं खिशातून एक तिकीट काढून मला दिलं आणि स्मित करत म्हणाला : "मॅचचा आनंद घ्या!" अर्थात् फुकट मॅच पाहायला मिळाल्याचा आनंद वेगळाच असतो!

* * *

जेव्हा माझे केंब्रिजमधले सहविद्यार्थी कुमार चित्रे आणि मी हंटिंग्डन या लहानशा गावी गेलो होतो, तेव्हा बॉबीचा दुसरा अनुभव आला. हे गाव केंब्रिजपासून सुमारे १६ मैलांवर असून, तिथलं हॉस्पिटल हे आमचं गन्तव्यस्थान होतं आणि तिथं आमचे निमंत्रक होते डॉ. अरुण महाजनी - रँग्लर महाजनी यांचे सुपुत्र. अरुण महाजनींच्या आदरातिथ्याचा लाभ आम्ही - धडधाकट असूनही- ब्रिटनच्या विविध रुग्णालयांत घेतला होता!

या वेळेला आम्ही केंब्रिज-हंटिंग्डन बसनं प्रवास केला. नंतर हंटिंग्डन बसस्थानकावर उतरून हॉस्पिटलचा रस्ता शोधत असताना आम्हाला एक बॉबी भेटला. साहजिकच आम्ही त्याला 'हॉस्पिटलचा मार्ग कुठला?' असं विचारलं. त्यानं आपल्या नेहमीच्या शैलीत रस्ता सांगितला. अमुक पेट्रोलपंप किंवा तमुक हॉटेल (म्हणजे रेस्टॉं), डायगोनली अपोझिट, शाळेचं मैदान इत्यादी गोष्टींचा वापर न करता रस्ता सांगता येतो; पण भारताबाहेर! आम्हाला मार्गदर्शन करून झाल्यावर पोलिस महाशयांनी एक आश्चर्याचा धक्का दिला. त्यानं विचारलं : "तुम्हाला डॉ. मजार्नींना भेटायचं आहे का?"

'महाजनी'चा पाश्चात्य जिभेनं केलेला अपभ्रंश परिचित असल्यानं आम्ही होकारार्थी मान डोलावली, तेव्हा त्यानं महाजनी कुठं राहतात, ती माहिती दिली अन् आत्ता रविवारी ते घरी सापडतील, हेही सांगितलं.

बॉबीच्या सर्वज्ञतेला दुवा देत आम्ही महाजनींना गाठलं आणि त्यांना सांगितलं : "अरुणसाहेब, पोलिसांतपण तुमची माहिती पोचली आहे!"

* * *

माझा तिसरा अनुभव माझ्या मोटारीशी जोडलेला आहे. केंब्रिजमध्ये मी विद्यार्थी असताना एक जुनी व्हॉक्सहॉल व्हेलॉक्स गाडी घेतली होती. माझ्या निवासस्थानी पार्किंगची सोय नसल्यानं मी ती रस्त्यावर कडेला पार्क करत असे; पण रात्रभर रस्त्यावर पार्क केलेल्या गाड्यांनी पार्किंग लाइट लावणं आवश्यक होतं; मात्र, अशा दिव्याचा भार कारबॅटरीवर पडल्यास दोन-तीन रात्रींत ती खचून जाई आणि तिला चार्ज करावं लागे. ही कटकट वाचवण्यासाठी मी एक असा रस्ता शोधून काढला, की जिथं गाडी रात्रभर दिव्याशिवाय पार्क करता येईल. प्रसिद्ध कॅव्हेंडिश प्रयोगशाळेशेजारीच हा रस्ता होता. तेव्हा मी बिनधास्तपणे त्या ठिकाणी कार पार्क करू लागलो.

त्या वर्षी डिसेंबरमध्ये मी व माझा धाकटा भाऊ अनंत कार्डिफजवळ मर्थर टिडव्हिल गावी गेलो होतो. आमचे निमंत्रक होते डॉ. अरुण महाजनी आणि त्यांच्या सौजन्यानं आम्ही या वेळी वेल्समधल्या रुग्णालयात होतो; अर्थात रुग्ण म्हणून नव्हे, तर तेथल्या डॉक्टरांचे पाहुणे म्हणून!

१९६२ सालचा हिवाळा अतिकडक होता, तरी त्याला तोंड देत आम्ही एक आठवडा वेल्समध्ये फिरलो. पुढं केंब्रिजला परतल्यावर पहिल्याच सकाळी मी कॅव्हेंडिशकडं चक्कर टाकली आणि मला शॉक बसला!

माझी कार गायब झाली होती. आसपास फिरून पाहिलं; पण तिचा पत्ता नव्हता. आठ दिवस वापरली नाही म्हणून ती पोलिसांनी तर हलवली नाही? माझ्या डिपार्टमेंटमधल्या विद्यार्थ्यांनी सल्ला दिला : "तू पोलिस स्टेशनवर जाऊन विचार."

मी बिचकत बिचकत सेंट अँड्र्यूज स्ट्रीटवरच्या 'ठाण्या'वर गेलो. एका बॉबीनं माझं स्वागत केलं आणि येण्याचं कारण विचारलं. मी कारचा इतिहास सांगून विचारलं : "तुम्ही ती गाडी हलवून ताब्यात घेतली आहे का?"

बॉबी म्हणाला : "थांबा मी चौकशी करून सांगतो."

तो दहा मिनिटांत परत आला. तोपर्यंत आपल्याला किती दंड भरावा लागणार, याचा मी अंदाज करत होतो; पण तो उत्तरला : "गाडी आमच्या ताब्यात नाही. जर तुम्ही ती कुणाला दिली नसेल, तर ती चोरीला गेली आहे."

'बाप रे! हे काय नवीन लचांड?' मी स्वतःशी उद्गारलो. माझी चर्या पडलेली पाहून बॉबीमहाशय हसले अन् म्हणाले :

"मी रेडिओवर आमच्या ठाण्यांना सूचना देतो. गाडी सापडली, की तुम्हाला फोन करून सांगेन."

त्यानं गाडीची माहिती लिहून घेतली. मी डिपार्टमेंटमध्ये परतलो, तेव्हा सकाळचे दहा वाजले होते. गाडी चोरीला जाणं, ही माझ्या लेखी अनपेक्षित घटना होती. ती सापडणं, ही घटना त्याहूनही अनपेक्षित असणार होती!

...पण दीडच्या सुमाराला पोलिस स्टेशनकडून फोन आला : "तुमची गाडी सापडली आहे. केंब्रिजपासून दहा मैलांवर एका लहान रस्त्यावर ती उभी करण्यात आली आहे. बॅटरी डाउन आहे. तुम्ही ती केव्हाही घेऊन जाऊ शकता!"

मी चकित झालो. शेरलॉक होम्स मला वास्तवात पाहायला मिळत होता; तोही कॉनन डॉयलनं 'बुद्दू' म्हणून वर्णन केलेल्या पोलिस खात्यात! मी बॉबीला धन्यवाद देऊन विचारलं : "...पण कार कुठल्या कारणानं चोरली गेली होती?"

बॉबी उत्तरला : "इथं काही मैलांवर एअरफोर्स बेस आहे. तिथले सैनिक वीक एंडला पार्टी, सिनेमा, नाटकं आदी निमित्तानं केंब्रिजला येतात. तुमच्या गाडीसारखी वापरात नसलेली गाडी दिसली, की ती 'जॉय राइड'साठी वापरून कुठंतरी सोडून दिली जाते. असं करणाऱ्यांना आम्ही 'चोर' म्हणत नाही; पण 'खोडकर' म्हणू शकतो."

अंसे हे बॉबी...!